# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
म्हसरूळ, दिंडोरी रोड, नाशिक- ४२२ ००४
Phone: 0253-2539176 E-mail: pr@muhs.ac.in,/ Web: www.muhs.ac.in

मआविवि / पीआर / 838 / 2025 **वृत्तप्रसिध्दीसाठी** दि. 24 फेब्रुवारी 2025

## आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा 24 वा दीक्षांत समारंभ संपन्न
# सामाजिक संवेदनशिलता कायम राखून सर्वसामान्यांची रुग्णसेवा करा
**– मा. राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन**

**नाशिक : (दि.24)** – सामाजिक संवेदनशिलता कायम राखून सर्वसामान्यांची रुग्णसेवा करा. आयुष्यात कितीही मोठे यश वैद्यकीय सेवेत मिळाले तरी समर्पण भाव ठेवून सर्वसामान्य रुग्णांशी नाळ जोडून ठेवा, महिन्यातून एक दिवस तरी शासकीय रुग्णालयांमध्ये सेवा द्यावी असे प्रतिपादन विद्यापीठाचे मा. कुलपती तथा राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. विद्यापीठाचा चोवीसावा दीक्षांत समारंभ मा. कुलपती तथा राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षेतखाली संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे मा. प्रति–कुलपती तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. नामदार श्री. हसन मुश्रीफ, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. गंगाधर हे सन्माननीय अतिथी, विद्यापीठाच्या मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले, मा. राज्यपाल यांचे सचिव श्री. प्रशांत ननावरे, वैद्यकीय विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विठ्ठल धडके, दंत विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. विभा हेगडे, आयुर्वेद व युनानी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद आवारे, होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजकुमार पाटील, नर्सिंग विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीलेखा राजेश, तत्सम विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रविणकुमार, मा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. विलास वांगीकर, डॉ. मनिष इनामदार, प्रति–कुलगुरु डॉ. मिलींद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी श्री. बोधीकिरण सोनकांबळे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात मा. कुलपती तथा राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले की, आरोग्य शिक्षण घेतातांच विद्यार्थ्यांनी समर्पक भाव ठेवावा लागतो. त्या शिवाय ते शिक्षण पूर्ण होत नाही असाच समर्पक भाव सर्वसामान्य जनेतेशी ठेवावा जेणे करुन व्यवसायात कालांतराने तुम्ही मोठे व्हाल. तुम्हाला सातत्य ठेवण्यासाठी वाट पहावी लागते मात्र तरीही तुम्ही महिन्यातून एखादा दिवस तरी सर्वसामान्यांची सेवा करण्यासाठी द्यायला हवा. सामाजिक बांधिलकी म्हणून शासकीय रुग्णालयात एक दिवस आवर्जुन रुग्णसेवा करावी असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आरोग्य सेवा क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा करतांना कधीही आशा सोडू नये. कोविड कालावधीत जगभरात डॉक्टर्स आणि नर्सेस यांनी एखाद्या सैनिकाप्रमाणे लढा दिला असे त्यांनी सांगितले. शासकीय रुग्णालये अद्ययावत करण्यासाठी शासन स्तरावरुन प्रयत्न करण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सामाजिक व शैक्षणिक मूल्यांची आठवण ठेवून सचोटी, उत्कृष्टता, करुणा आणि सेवा गुणांची जोपासना करावी. ज्ञान आणि कौशल्ये शोधणे कधीही थांबवू नका. विद्यार्थ्यांचे सर्मपण, उत्कृष्टता आणि वचनबध्दता याने यश प्राप्त करण्यात सुलभता येईल असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यापीठाचे मा. प्रति–कुलपती तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. नामदार श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, रुग्णसेवा ही परमेश्वराची सेवा आहे. याचा मान राखून नैतिकता राखत पुढील कारकिर्दीचा प्रारंभ करा असा संदेश दिला. डॉक्टर होण्याचे स्वप्न मोठया परिश्रमाने तुम्ही पूर्ण केले आहे. सामाजिक संवेदनशिलता कायम राखून सर्वसामान्यांची आरोग्याची काळजी घेतली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आधुनिक पध्दतीत आरोग्य शिक्षण देणे गरजेचे आहे. आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षण आणि संशोधन सुनिश्चित करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. आरोग्य सेवा व शिक्षण समतोल राखणे गरजेचे आहे. नुकतीच वैद्यकीय विद्याशाखेच्या प्रवेशक्षमतेत एक हजाराची वाढ करण्यात आली आहे याबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. गंगाधर यांचे आभार मानले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. गंगाधर यांनी सांगितले की, दीक्षांत समारंभ विद्यार्थ्यांनी केलेले परिश्रमाचा आनंद व्यक्त करण्याचा ऐतिहासिक क्षण आहे. आरोग्य सेवा करतांना फक्त उपचार न करता रुग्णांशी भावनीक नाते दृढ करण्याचा प्रयत्न आरोग्य क्षेत्रातील लोकांनी करणे गरजेचे आहे. विद्यापीठाने एकात्मिक शिक्षणासाठी घेतलेला पुढाकार आदर्श आहे. नवीन शिक्षण प्रणालीचा वापर करुन डिजिटल शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर योगा व ध्यानावर लक्ष केंद्रीत करावे जेणेकरुन मानसिक स्वास्थ्य सुदृढ राहील. शिक्षणात येणाऱ्या अडचणी आपणांस खूप शिकवून जातात, त्यातून सकारात्मक पध्दतीन धडा घेणे आवश्यक आहे. शिक्षणाची गुणवत्त व दर्जा सुधारण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे. डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी शासनाकडून नियमावली करण्यात आली असून त्याची यथायोग्य अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी प्रास्ताविकात सांगितले की, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे. विद्यार्थ्यांनी कौशल्य

शिक्षणावर अधिक भर द्यावा. त्याचा वापर क्षमता वाढीसाठी करणे आवश्यक आहे. आरोग्य सेवा करतांना सकारात्मक योगदान देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ध्येय साध्य करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे महत्वाचे आहे जेणेकरुन आपण अनेक बाबी साध्य करु शकतो असे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम उपक्रम सध्या इंटर्नशिप घेणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ''कुलगुरु कट्टा'' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी सुरु करण्यात आला आहे. प्रशासनात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सी–डॅकच्या मदतीने विद्यापीठ प्रशासनाच्या संपूर्ण प्रकियेचे संगणकीकरण करण्याचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. या उपक्रमांतर्गत, इन्व्हेंटरी मॅनेजमेंट सिस्टम, नवीन महाविद्यालये उघडण्यासाठी अर्ज मागवणे, विद्यार्थी कल्याण योजना, सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या तपासणीसाठी स्थानिक तपासणी समित्यांची नियुक्ती आदी कामे पूर्णपणे संगणकीकृत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी फ्लॅग फाऊंडेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. नवीन जिंदाल यांचा संदेशाचे वाचन मेजर जनरल अशिम कोहली यांनी केले. या संदेशात त्यांनी सांगितले की, भारतीय राष्ट्रध्वजाचा सर्वांनी अभिमान बाळगावा. तिरंगा ध्वजापासून आपणास प्रेरणा मिळते. आपले काम प्रामाणिकपणे करावे जेणेकरुन त्याचा सर्वांना उपयोग होतो. राष्ट्रध्वज सर्वसामान्यांनी वर्षभर वापरता यावा यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न करण्यात आले असून त्याची जाणीव सर्वांनी ठेवावी असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठाचा दीक्षांत समारंभाचा विद्यापीठातील शिक्षक प्रशिक्षण प्रबोधिनीत मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने प्रारंभ झाला. यावेळी मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते नर्सिंग विद्याशाखेच्या ब्ल्यु प्रिंट करिक्युलम पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या समारंभात विविध विद्याशाखांच्या पदवीका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व आंतरवासियता पूर्ण केलेल्या आरोग्य शाखांच्या 8547 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्या आहेत. विविध विद्याशाखांमधील गुणवत्ता प्राप्त केलेल्यांना 139 सुवर्णपदक, एक विद्यार्थ्यांस रोख रक्कम पारितोषिक, संशोधन अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या 15 विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली.

दीक्षांत समारंभात आधुनिक वैद्यक विद्याशाखा पदवीचे 391, दंत विद्याशाखा पदवीचे 1816, आयुर्वेद विद्याशाखेचे 687, युनानी विद्याशाखेचे 49, होमिओपॅथी विद्याशाखेचे 1455, बेसिक बी.एस्सी. नर्सिंग 468, पीबी बी.एस्सी. नर्सिंग विद्याशाखेचे 636, बी.पी.टी.एच. विद्याशाखेचे 370, पॅरामेडिकल विद्याशाखेचे 517, पदवी ऑप्टोमेट्री 17, पदविका ऑप्टोमेट्री 10, ऑक्युपेशनल थेरपी पदवी अभ्यासक्रमाचे 21, बी.पी.ओ. विद्याशाखेचे 03, बी.ए.एस.एल.पी. 05, तसेच पदव्युत्तर विद्याशाखेमध्ये पी. जी. दंत 498, एम. पी. एच. 04 पी.जी. आयुर्वेद 820, पदविका आयुर्वेद 06, पी.जी. होमिओपॅथी 249, पी.जी. एम.ए.एस.एल.पी. 03, पी.जी नर्सिंग 241, पी.जी. ऑक्युपेशनल थेरपीचे 01, पी.जी. फिजिओथेरपी 19, पी.जी. डि.एम.एल.टी. 132, डिप्लोमा पॅरामेडिकल विद्याशाखेचे 129 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली आहे.

**मा. राज्यपाल यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे लोकार्पण**

आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ 75 फुट उंचीचा राष्ट्रध्वज स्तंभ उभारण्यात आला आहे. मा. राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे मा. प्र–कुलपती तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. नामदार श्री. हसन मुश्रीफ व नवी दिल्ली येथील राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. गंगाधर, मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त), मा. खासदार डॉ. शोभा बच्छाव, फ्लॅग फाऊंडेशन ऑफ इंडियाचे मेजर जनरल अशिम कोहली, प्रति–कुलगुरु डॉ. मिलींद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ आदी मान्यवर उपस्थितीत होते.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी मा. कुलपती महोदय यांना दीक्षांत समारोह प्रारंभ करण्याची विनंती केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडून यांनी मानले. या समारंभास विद्यापीठ विद्यापीठ विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते तसेच दीक्षांत समारंभाचा ऑनलाईन कार्यक्रमास विविध प्राधिकरण सदस्य, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठया संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

**कुलसचिव**

---

**मा. संपादक,**
सदर वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्यांमधून प्रसिध्द करावे ही विनंती.

**(डॉ. स्वप्नील तोरणे)**
**जनसंपर्क अधिकारी**


प्रमुख अतिथी :
सन्माननीय अतिथी :
MUHS


महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२४ वा दीक्षांत समारंभ
MUHS
24th
CONV


"MUHS @ 2025 "
"Instruction ends in the schoolroom, but education ends only with life." —Frederick W. Robertson
SILVER 25 JUBILEE
MUHS
Lt Gen Madhuri Kanitkar PVSM AVSM VSM (Retd)
Vice Chancellor
MUHS
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक


MUHS
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
२४ वा दीक्षांत समारंभ
सोमवार, दि.२४ फेब्रुवारी, २०२५
अध्यक्ष : श्री. सी.पी.राधाकृष्णन
माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा माननीय कुलपती, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
प्रमुख अतिथी : श्री. हसन मुश्रीफ
माननीय मंत्री, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, तथा
माननीय प्रति-कुलपती, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सन्माननीय अतिथी : डॉ. बी. एन. गंगाधर
अध्यक्ष, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली
प्रमुख उपस्थिती
कुलगुरु, लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त), पीव्हीएसएम, एव्हीएसएम, व्हीएसएम
प्रति-कुलगुरु, प्रा. डॉ. मिलिंद निकुंभ
डॉ. संदीप कडू
परीक्षा नियंत्रक
24th CONVOCATION
MUHS
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक


Dr. Pol Sujata
Dr. Gopal Jadhav
Dr. Kavita Patil
Ph.D. Awardee
Dr. Pravin Bhat
MUHS

